C020260012

D.R.No.
Date: 03/02/2026

Hon'ble Civil Judge Junior Division Kagal
~~HON'BLE DISTRICT JUDGE~~ KOLHAPUR

# CIVIL CASE FILING FORM

CASE TYPE - Civil M. Application

## PLAINTIFF / APPELLANT / APPLICANT'S DETAILS

Name: Shri. Jagjit Shrikant Bhosale

Father's /Mother's/Husband's Name - Shrikant Bhosale

Address: R/o. 948, B Ward, Kapade Galli, Ravivar Peth, Kolhapur

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Sex | Male : Yes | Female - | Age: 44 | Caste: Hindu |

| | | |
|---|---|---|
| Nationality<br>If, Other mention | Indian - Indian | Occupation : Agri & ~~[illegible]~~on business |
| E-mail address – | Phone No. 9371839297 | Fax No. ------- |

Subject : Application ~~as per 2A~~ u/o 39 R2A of C.P. Code

Advocate Code- MAH/1410/2002 Advocate Name - ADV. H. P. RANDIVE
Kolhapur Code- 701 E-mail address h_ranadive @yahoo.com Mobil No. 9822769913

## DEFENDANT / RESPONDANT / NON-APPLICANT'S DETAILS

Name : Rajendra Nanaso Chavan

Father's /Mother's/Husband's Name: - Nanaso Chavan

Address: R/o. Patil Galli, Murgud, Tal. Kagal, Dist. Kolhapur

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Sex | Male- Yes | Female: --- | Age: - -45 | Caste : - --- Hindu |

| | | |
|---|---|---|
| Nationality | Indian- Indian<br>If, Other mention | Occupation : ---Service |
| E-mail address | Phone No.<br>Mobil No. | Fax No. |

Subject
Advocate Code Advocate Name

## LOWER COURT'S DETAILS

Court Name

Case Name Decision Date

## MAIN MATTER DETAILS

Court type Case No. Year

## FOR OFFICE USE ONLY

| | | |
|---|---|---|
| Case Type | Filling No. | Filling Date |
| Objection Redressed Date | Objection Compliance Date | |
| Registration No. | Registration Date | Listing Date |
| Court Allotted | Allocation Date | |

Presented By

Civil M.A. 6/2026
Exh. 1

दैनिक रजि. नं. /२०२६
दाखल ता. /०२/२०२६

दिवाणी किरकोळ अर्ज नं. /२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो कनिष्ठ स्तर, कागल
यांचे कोर्टात

| | |
|---|---|
| श्री. जगजित श्रीकांत भोसले<br>व.व. ४४, धंदा — शेती व व्यवसाय,<br>रा. ९४८, बी वॉर्ड, कापडे गल्ली,<br>रविवार पेठ, कोल्हापूर | अर्जदार |

विरुध्द

| | |
|---|---|
| श्री. राजेंद्र नानासो चव्हाण<br>व.व. ४५, धंदा — नोकरी,<br>रा. पाटील गल्ली, मुरगुड,<br>ता. कागल, जि. कोल्हापूर | वि.प. |

सी.पी.सी. ऑ. ३९ रूल
२अ प्रमाणे अर्ज

यातील अर्जदार में. कोर्टास नम्रपणे कळवितात की,

१) मिळकतीचे वर्णन :—

मुरगुड ता. कागल, जि. कोल्हापुर येथील गट नं. १९६/२ एकुण क्षेत्र हे. ०—१९.२० आर पैकी क्षेत्र हे. ०—०५.६१ आर ही मिळकत त्यासी चतु:सिमा:—

पूर्वेस :— अंतर्गत रस्ता
पश्चिमेस :— अंतर्गत रस्ता

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

Order
Issue notice to non-applicant
C.J.J.D.Kagal
Dt. 13.02.2026

दक्षिणेस :— मेंडके यांची मिळकत
उत्तरेस :— अक्षय कृष्णात प्रभावळे यांची मिळकत

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यामधील बेकायदेशीर चालु असलेले आर.सी.सी. बांधकाम या अर्जाचा विषय असून त्यास येथून पुढे दावा मिळकत असे संबोधणेचे आहे.

२) वर कलम १ मध्ये नमुद मिळकत यातील अर्जदारचे कायदेशीर मालकी व वहीवाटीची मिळकत होय.

३) वर कलम १ मध्ये नमुद मिळकत मुळची अन्तोन लुईस फर्नांडीस वगैरे यांचे मालकी व वहीवाटीची होय. सदर अन्तोन लुईस फर्नान्डीस वगैरे यांनी सदर मिळकत प्रस्तुत वादी यांना रजी. दस्त नं. २७४० ता. ८/९/२०२३ इा रोजीचे खरेदीपत्राने कायम खुष खरेदी दिलेली आहे. सदर खरेदीचा मोबदला रू. १०,३०,०००/— वादीने अन्तोन लुईस फर्नान्डीस यांना रितसर अदा केला आहे. सदर खरेदीपत्राप्रमाणे दावा मिळकतीचे सातबारापत्रकी अर्जदार यांचे नांवाची नोंदी झालेली आहे.

एकंदर दावा मिळकत अर्जदार यांचे कायदेशीर मालकी व वहीवाटीची मिळकत होय.

४) प्रस्तुत वि.प. यांचा दावा मिळकतीशी कोणताही कायदेशीर हक्क वा संबंध नव्हता व नाही.

५) तथापी प्रस्तुत वि.प. हे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करणेचे इरादयाने बेकायदेशीरपणे बांधकाम करत असलेने अर्जदार यांनी या में. कोर्टामध्ये दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये व अर्जदारचे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये याबाबत रे.क.नं. १५६/२०२५ हा कायम मनाईचा दावा दाखल केला.

६) सदरकामी वादीने दावा मिळकतीमध्ये बांधकाम करू नये म्हणुन प्रतिवादी विरूध्द तुर्तातुर्त मनाई अर्ज नि. ५ ला दावे सोबत दाखल केलेला आहे. सदरचा नि. ५ चा अर्ज में. कोर्टाने ता. ११/१२/२०२५ इा रोजी गुणदोषावर मंजुर केला आहे. तसेच सदरकामी में. कोर्टाने खालील प्रमाणे आदेश पारीत केलेला आहे.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

## ORDER

1. Application below Exh. 5 and Exh.11 are allowed.

2. Defendant or their agents are restrained by way of temporary injunction from interfering with possession of Plaintiff over the suit property and carrying out construction in the suit property bearing Gat No.196/2 admeasuring 0-5.61 R and more specifically described in paragraph no.1 of the plaint till the final disposal of the suit.

3. Cost in main cause.

Kagal
Date 11/12/2025 Civil Judge Junior Division Kagal

७. सदर मनाई आदेशाची वि.प. यांना पुर्ण माहिती व जाणीव होती व आहे. प्रतिवादी यांनी वकिल दिलेले असुन गुणदोषावर सदरचा आदेश पारीत झालेला आहे.

८. एकंदर वि.प. यांना दावा मिळकतीमधील मनाई आदेशाची पुर्ण माहिती असताना बेकायदेशीर व अनाधिकारापणे दावा मिळकतीमध्ये ता. ११/१२/२०२५ नंतर बेकायदेशीर बांधकाम चालुच ठेवलेले आहेत. मा. न्यायालयाचा मनाई आदेश असताना वि.प. यांनी पहिले मजल्याचे स्लॅप ता. १०/०१/२०२६ इा रोजी टाकलेले आहे. त्यावेळीच देखील अर्जदार यांनी वि.प. स मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे बांधकाम बंद ठेवणेबाबत बजावले होते. तथापी वि.प. हे ऐकणेस तयार नाही.

९. ता. २२/०१/२०२६ इा रोजी अर्जदार हे मुरूगुड येथे दावा मिळकतीत गेले असता तेथे वि.प. हा अर्जदार यांना भेटला. तो स्वत: उभा राहुन कामगारामार्फत बांधकाम पुर्ण करून घेत होता. सदर वि.प. यांचे कामगार हे भिंती बांधणे, गिलावा करणे इत्यादी बांधकामाची कामे करत होते. त्यावेळीस अर्जदार यांनी वि.प.स मा. न्यायालयाची मनाई आहे, बांधकाम करू नकोस' असे समजावणेचा प्रयत्न केला. तथापी वि.प. ने ''मी कोर्ट वगैरे काय मानत नाही, तु

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

मला कोण सांगणार, जा येथुन नाही तर तुला ठार मारतो'', अशी धमकी अर्जदार यांस दिली. त्यावेळी अर्जदारने सोबतचे फोटोग्रफर कडुन सदरचे चालु बांधकामाचे फोटो काढुन घेतले. सदरचे वि.प. चे कृत्य बेकायदेशीर व अनाधिकाराचे आहे.

१०. एकंदर वि.प. यांना त्यांचे विरूध्द असले मनाई आदेशाची पुर्ण माहिती असताना बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने हेतु पुरस्पर दावा मिळकतीमध्ये वादीचे हक्क डावलणेच्या दुष्ट हेतुने बांधकाम चालुच ठेवलेले आहे. वि.प. हे जाणीवपुर्वक व हेतुपुरस्पर में. कोर्टाची मनाई आदेशाचा भंग करत आहेत. सदरचे कृत्य हे में. कोर्टाचे आदेशाचा अनादर करणारे आहे.

वि.प. स वेळोवेळी बांधकाम बंद करणेबाबत सांगुनही तो ऐकणेस तयार नाही व अर्जदारास उलट धमकी देत आहे. त्याकारणांने अर्जदार यांनी वि.प. विरूध्द दि. २३/०१/२०२६ इा रोजी पोलिस ठाणे येथे तक्रार ही केलेली आहे. सदरचे प्रतिवादीचे कृत्य बेकायदेशीर व में. कोर्टाचे हुकुमाचा अनादर करणारे असे आहे.

११. वि.प. हे कायदा पाळणेस तयार नसुन में. कोर्टाचे आदेशाचे पालन करणेचे नाही. या दृष्ट हेतुने कृती करत आहेत. केवळ अर्जदार यांची मिळकत हडप करायची या दृष्ट हेतुने वि.प. ने सदरची बेकायदेशीर कृत्य केलेली आहेत.

१२. सदर प्रकारामुळे अर्जदार हीला समजताच खुप मोठा मानसिक धक्का बसला. वि.प. चे बेकायदेशीर कृत्यामुळे अर्जदार हीला नाहक मानसिक, आर्थीक व शारिरीक त्रास सहन करावा लागला आहे. त्याकारणाने वि.प. यांना कडक शासन होणे व अर्जदार यांस वि.प. कडुन नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे.

वि.प. यांचा हेतू प्रामाणिक नाही. अशा परिस्थिती मध्ये वि.प. वर में. कोर्टाचे हुकुमाचा अवमान केला म्हणुन कडक कारवाई होणे आवश्यक आहे.

१३. मे. कोर्ट व मे. कोर्टाच्या आदेशा बाबत जन माणसात आदर राखता यावा तसेच, मे. कोर्टाचे हुकूमाचा कोणीही भंग करु नये त्याकरीता व न्यायाची चाड राखणे करिता सदर कामी वि.प. वर कडक कारवाई होणे आवश्यक आहे.

१४. सदरप्रमाणे कारवाई केलेने वि. प. चे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट कारवाई न झालेस अर्जदाराचे कायदेशीर हक्क डावलले जावून कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

१५. अर्जास कारण :—

प्रस्तुत वि.प. यांनी ता. ११/१२/२०२५ ह्या रोजी मनाई आदेश होवुनही बेकायदेशीरपणे अतिक्रमणीत बांधकाम चालुच ठेवले तेंव्हा व तदनंतर वेळोवेळी प्रस्तुत अर्जास कारण घडले आहे.

१६. प्रस्तुतचा अर्ज मुदतीत आहे.

१७. प्रस्तुत अर्जास योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावला आहे.

१८. प्रस्तूतचा अर्ज या मे. कोर्टात चालणेस पात्र आहे.

१९. अशा पध्दतीचा याच कारणांवरून अन्य अर्ज अर्जदार हीने कोणत्याही अन्य न्यायालयात दाखल केलेला नाही.

२०. सबब, अर्जदारांची विनंती की,

अ. प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब. प्रस्तुत वि.प. यांनी मा. कोर्टाचे आदेशाचा भंग केला व अवमान केला म्हणुन प्रत्येक वि.प. यांना तीन महीने तुरूंगवासाची शिक्षा करणेत यावी.

क. तसेच वि. प. यांची मालमत्ता जप्त व विक्री करून वि.प. कडुन अर्जदार यांना नुकसान भरपाई मिळावी.

ड. न्यायाचे सर्व हुकूम अर्जदाराचे वतीने व्हावेत.

इ. जरूर तर अर्ज दुरूस्ती परवानगी असावी.

येणेप्रमाणे अर्ज असे.

कागल
ता. 3/०२/२०२६.

Drafted & Presented by

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

प्रतिज्ञा

मी अर्जदार श्री. जगजित श्रीकांत भोसले व.व. ४४, धंदा — शेती व व्यवसाय, रा. ९४८, बी वॉर्ड, कापडे गल्ली, रविवार पेठ, कोल्हापूर सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील कलम १ ते १४ मध्ये नमुद मजकुर माझे माहिती प्रमाणे व कलम १५ ते १९ मधील मजकुर मला मिळाले सल्या प्रमाणे खरा व बरोबर आहे व कलम २० ही माझी विनंती आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.

~~कागल~~ कोल्हापुर

ता. ०३/०२/२०२६.

JSBhosale

ॲफिडेव्हीट

मी अर्जदार श्री. जगजित श्रीकांत भोसले व.व. ४४, धंदा — शेती व व्यवसाय, रा. ९४८, बी वॉर्ड, कापडे गल्ली, रविवार पेठ, कोल्हापूर शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील सर्व मजकूर आमचे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हीट. आज मुक्कामी कोल्हापुर

~~कागल~~ कोल्हापुर

ता. ०३/०२/२०२६.

JSBhosale

I know the deponent

Adv H.P. Ranadive

प्रतिज्ञा

मी अर्जदार श्री. जगजित श्रीकांत भोसले व.व. ४४, धंदा — शेती व व्यवसाय, रा. ९४८, बी वॉर्ड, कापडे गल्ली, रविवार पेठ, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.

~~कागल~~ कोल्हापुर

ता. ०३/०२/२०२६.

JSBhosale

Solemnly Affirmed before me by
Shri Jagjit Shrikant Bhosale a/c 44
of B ward Kolhapur who is
identified by Shri Adv. H.P.
Ranadive whom I know personally
Dated :- 3-2-26

3-2-26.

Assistant Superintendent.

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.13 16:51:25 +0530